**ठळक बातम्या**

- जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस दावोसला रवाना
- देशाला संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर बनवणं हे सरकारचं प्रमुख उद्दिष्ट असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचं नागपुरात प्रतिपादन
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आसाम आणि पश्चिम बंगालमधे ७ हजार ७८० कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचा प्रारंभ
- भाजपाचे ज्येष्ठ नेते राज पुरोहित यांचं निधन

**आणि**

- एकदिवसीय क्रिकेट मालिकेत इंदूर इथं सुरु असलेल्या तिसऱ्या सामन्यात न्यूझीलंडचं भारतापुढं विजयासाठी ३३८ धावांचं आव्हान

**<><><><><>**

स्वित्झर्लंडमध्ये उद्यापासून सुरु होत असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आज दावोस इथं पोहोचले. उद्योग मंत्री उदय सामंत आणि प्रशासनातल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा मुख्यमंत्र्यांच्या पथकात समावेश आहे.

या परिषदेत, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, आसाम आणि झारखंडचे मुख्यमंत्री जागतिक उद्योग गट, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी चर्चा करतील आणि आपल्या राज्यात  थेट परकीय गुंतवणूक, औद्योगिक प्रकल्प, रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देण्यावर भर देतील असा अंदाज आहे.

**<><><><><>**

देशाला संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर बनवणं हे सरकारचं प्रमुख उद्दिष्ट असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नागपूर इथं

वार्ताहरांशी बोलत होते. शिवा - सावंगा परिसरात स्थापन केलेल्या मीडियम कॅलिबर ऍम्युनिशन फॅसिलीटी इथं पिनाका गायडेड रॅकेटचं पहिलं उत्पादन पाठवण्यात आलं, यावेळी संरक्षण मंत्री उपस्थित होते. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हेही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आसाममधे ६ हजार ९५० कोटी रुपये खर्चाच्या, तर पश्चिम बंगालमधे सिंगूर इथं ८३० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध प्रकल्पांचं भूमीपूजन आणि उद्घाटन केलं. आसामच्या काझीरंगा अभयारण्यात पोहचण्यासाठीच्या उन्नत मार्ग प्रकल्पाचं भूमीपूजन कालियाबोर इथं करताना मोदी यांनी काझीरंगा अभयारण्याचं जागतिक वारशातलं महत्त्व अधोरेखित केलं. आसामसधल्या ३ नवीन अमृत रेल्वेगाड्यांना त्यांनी हिरवा झेंडा दाखवला.

बंगालमधे बालागढ इथं हुगळी नदीवरच्या पोर्ट गेट यंत्रणेची पायाभरणी त्यांनी केली. या यंत्रणेमुळे पश्चिम बंगालमधे दळणवळणाच्या पर्यावरणस्नेही मार्गाला प्रोत्साहन मिळेल, रोजगारनिर्मिती होईल, तसंच प्रदूषणाला आळा बसेल असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला....

**होल्ड - बाईट- प्रधानमंत्री**

अंतर्गत वाहतुकीसाठी विजेवर चालणाऱ्या अत्याधुनिक कॅटामरान बोटीचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांनी केलं. बंगालमधल्या दोन नवीन रेल्वे मार्गांचं उद्घाटन त्यांनी केलं,तसंच ३ नवीन अमृत भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. त्यानंतर प्रधानमंत्र्यांनी सिंगूर इथं जाहीर सभा घेतली.

**<><><><><>**

विदर्भातली नैसर्गिक संसाधनं, कृषी क्षेत्र आणि कृषी आधारित उद्योग तसंच सेवा क्षेत्र यांचं व्यवस्थापन करून विदर्भात भांडवली उद्योग स्थापन करून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल, असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं

आहे. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट यांच्या वतीनं नागपुरात ‘ॲडव्हांटेज विदर्भ २०२६- खासदार औद्योगिक महोत्सव’ आयोजित केला जाणार आहे. त्याची माहिती देण्यासाठी आज आयोजित वार्ताहर परिषदेत गडकरी बोलत होते.

ॲडव्हांटेज विदर्भ अंतर्गत ३५० हून अधिक स्टॉल्सचं औद्योगिक प्रदर्शन भरवलं जाणार आहे. त्यात १०० एमएसएमईचे स्टॉल्स, तसंच विदर्भात्या विविध जिल्ह्यांचे ४० स्टॉल्स असतील.

या प्रदर्शनात डिफेन्स पब्लिक सेक्टर युनिट्स, सेबी, बीएसई, एनएसई, एमसीएक्स, एनसीडीएक्स, एएमएफआय, रिअल इस्टेट, अक्षय ऊर्जा आणि स्टार्टअप्स अशा विविध क्षेत्रांतील उद्योगांचा सहभाग  असेल.

**<><><><><>**

७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यात यंदा महाराष्ट्राचा चित्ररथ गणेशोत्सव - आत्मनिर्भरतेचं प्रतीक या संकल्पनेवर आधारित असेल. या चित्ररथातून राज्याची पंरपरा आणि अर्थव्यवस्थेचं दृष्य साकारलं जाणार आहे. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी केंद्रसरकारच्या कार्यक्रमांची उत्कृष्ट अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंचांना विशेष आमंत्रण आहे. जळगाव जिल्ह्यातल्या पहूरपेठ ग्रामपंचायतीचं सरपंच अब्बू तडवी यांचा त्यात समावेश असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

माजी मंत्री  आणि वरिष्ठ भाजपा नेते राज पुरोहित यांचं आज मुंबईत   प्रकृती अस्वास्थ्यामुळे  निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते.

पुरोहित यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात नगरसेवकपदापासून केली. त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेत त्यांनी २५ वर्षं आमदार म्हणून काम केलं. १९९५ ते १९९९ दरम्यान, युती सरकारमध्ये त्यांनी  कामगार, दुग्धविकास आणि संसदीय कार्य मंत्री तसंच नंतर गृहनिर्माण मंत्री म्हणूनही त्यांनी काम केलं. ते काही काळ भाजपाचे मुंबई अध्यक्षही होते.

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडनवीस यांनी राज पुरोहित यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. दृढता आणि आक्रमकता हा त्यांचा स्थायीभाव होता, त्यांच्या निधनामुळे भाजपानं एक दिलदार व्यक्तिमत्व गमावलं आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, भाजपाचे राष्ट्रीय महासचिव **विनोद** तावडे, भाजपा नेते आणि मंत्री आशीष **शेलार** यांनी राज पुरोहित यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ इतिहाससंशोधक रामचंद्र मोरवंचीकर यांचं छत्रपती संभाजी नगर इथं प्रदीर्घ आजारानं निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात इतिहास विभागाचे प्रमुख म्हणून त्यांनी काम पहिलं तसंच पर्यटन विभागाचे संचालक म्हणूनही ते कार्यरत होते. ‘प्रतिष्ठान ते पैठण’ हा त्यांचा ग्रंथ सातवाहन काळाच्या अभ्यासाकरता महत्वाचा स्रोत ठरला. १६ पुस्तकं आणि २०० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शोधनिबंध त्यांनी लिहिले. प्रतापनगर स्मशानभूमी इथं त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाले.

**<><><><><>**

एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं यंदाच्या जेईई (मुख्य) सत्र- १ या परीक्षेसाठीची प्रवेशपत्रकं जारी केली आहेत. या महिन्याच्या २१ ते २४ तारखेदरम्यान बी.ई. अथवा बी.टेकच्या पेपर १ साठी बसणाऱ्या उमेदवारांना एनटीएच्या अधिकृत वेबसाइट jeemain.nta.nic.in वर जाऊन त्यांचं प्रवेशपत्र

डाउनलोड करता येणार आहे. ही परीक्षा सकाळी ९ ते दुपारी १२ वाजेपर्यंत आणि दुपारी ३ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत या दोन सत्रांमध्ये होईल.

त्यामुळं उमेदवारांनी प्रवेशपत्रावरचा क्यूआर कोड आणि बारकोड स्पष्टपणे दिसत असल्याची खात्री करावी. तसंच ओळख पडताळणीसाठी उमेदवारांनी अर्जात अपलोड केलेलं वैध छायाचित्र ओळखपत्र देखील बाळगावं अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणानं मंजुरी दिल्यानंतर त्र्यंबकेश्वर महानगरपालिकेनं दहा आखाड्यांमधे पायाभूत सुविधा उभारण्यासाठी ७ कोटी ५५ लाख रुपयांच्या निविदा मागवल्या आहेत. त्र्यंबकेश्वरच्या आखाड्यामधली ही कामं पहिल्या टप्प्यातली असून गरजेनुसार आणखी कामं मंजुर केली जातील, असं प्राधिकरणानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

नाशिकमध्ये नुकतंच चौथं अखिल भारतीय शेकोटी  लोककला साहित्य संमेलन पार पडलं. ज्येष्ठ साहित्यिक अलका दराडे आणि तमाशा कलावंत डॉ. रेश्मा परेतनीकर यांच्या हस्ते संमेलनाचं उदघाटन झालं. यावेळी  निर्माता दिग्दर्शक महेश मांजरेकर आणि अभिनेता भारत जाधव यांच्या हस्ते कवी राजू देसले यांचा, ‘समीक्षक म. सु. पाटील’ पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

**<><><><><>**

वाराणशीतल्या मणकर्णिका घाटाची मोडतोड केल्याप्रकरणी भाजपा सरकारनं माफी मागावी अन्यथा काँग्रेस वाराणसीत आणि महाराष्ट्रात राज्यभर आत्मक्लेश आंदोलन करेल, असा इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांन बांधलेल्या मणकर्णिका

घाटाची दुरुस्ती करता आली असती, मात्र सरकारनं घाट उद्‌ध्वस्त केला, त्यामुळे सरकारचा दांभिकपणा उघड झाल्याची टीका सपकाळ यांनी केली.

**<><><><>**

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी उद्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येतील. दुपारी दोन ते चार वाजेपर्यंत अर्ज भरता येतील असं पक्षाचे निवडणूक निर्णय अधिकारी के लक्ष्मण यांनी सांगितलं. दुपारी ४ ते पाच या दरम्यान अर्जांची छाननी होईल. संध्याकाळी ६ वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आणि अध्यक्षपदासाठी २० जानेवारीला मतदान होईल.

**<><><><>**

भारत-न्यूझीलंड एकदिवसीय क्रिकेट मालिकेत आज इंदूर इथं सुरु असलेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात न्यूझीलंडनं भारतापुढं विजयासाठी ३३८ धावांचं मोठं आव्हान ठेवलं आहे.

भारतानं नाणेफेक जिंकून, न्यूझीलंडला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं, आणि त्यांचे पहिले दोन गडी झटपट बाद केले. त्यानंतर विल यंगही ३० धावांवर बाद झाला. मात्र डेरिल मिशेल आणि ग्लेन फिलिप्स यांनी वैयक्तिक शतकं ठोकतानाच चौथ्या गड्यासाठी २१९ धावांची भागीदारी केली. डेरिल मिशेलनं १३७, तर ग्लेन फिलिप्सनं १०६ धावा केल्या. त्यामुळे न्यूझीलंडला निर्धारित ५० षटकात ८ गडी गमावून ३३७ धावा करता आल्या.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १३ षटकात ४ बाद ७१ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**